टंचाई निवारणासाठी जिल्हा वार्षिक योजनेतील निधीच्या प्राधान्यक्रमाबाबत.

महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग

शासन निर्णय क्रमांक : डीएपी-२०२६/ प्र.क्र.२८८(ई- १८९८८९२)/ जिनिस-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : १९ नोव्हेंबर, २०२६.

वाचा :

१. नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.जिवायो-१००७/ प्र.क्र.३९/ का.१४४४, दि.१६ फेब्रुवारी, २००८.
२. नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.डिएपी-१०२५/ प्र.क्र.३०५/ का.१४८१, दि.१ ऑगस्ट, २०२५.
३. नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.डिएपी-१०२५/ प्र.क्र.३४३/ का.१४८१, दि.२६ सप्टेंबर, २०२५.
४. नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.युपासू-२०२५/ प्र.क्र.०७/ का.१४१२, दि.१६ जुलै, २०२६.
५. मदत व पुनर्वसन विभाग, शासन निर्णय क्र. समिती-२०२६/ प्र.क्र.८२/ मदत-२, दि.२५ सप्टेंबर, २०२६ व दि.१४ ऑक्टोबर, २०२६.
६. नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.डिएपी-१०२६/ प्र.क्र.१९६/ का.१४८१ (ई-१७६२४१२), दि.०५ ऑक्टोबर, २०२६.
७. नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.डिएपी-१०२६/ प्र.क्र २७३/ जिनिस-१ (ई-१८९०५५१), दि. २७ ऑक्टोबर, २०२६.

प्रस्तावना :

राज्यातील विविध भागांमध्ये पर्जन्यमानातील अनिश्चितता, पावसातील दीर्घ खंड, भूजलपातळीतील घट तसेच जलस्रोतांमधील पाणीसाठा कमी होणे यामुळे दुष्काळ अथवा टंचाईसदृश परिस्थिती निर्माण होत आहे. अशा परिस्थितीत नागरिकांना पिण्याचे पाणी, पशुधनासाठी आवश्यक पाणी व चारा आणि इतर आवश्यक गरजा वेळेत उपलब्ध करुन देण्यासाठी प्रतिबंधात्मक आणि निवारणात्मक उपाययोजना तातडीने राबविणे आवश्यक आहे. त्यामुळे नवीन जलस्रोत निर्माण करण्याबरोबरच विद्यमान जलस्रोतांमधील पाण्याचा कार्यक्षम वापर शक्य करणारी अपूर्ण व दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यास प्राधान्य देणे व मोठ्या प्रमाणावर पाणी वापर होणाऱ्या व टंचाई निवारणासाठी अत्यावश्यक नसलेल्या नवीन बांधकामांना तात्पुरती स्थगिती देणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत निधीचे नियोजन, कामांचा प्राधान्यक्रम, जिल्हास्तरीय कृती आराखडा, तातडीच्या मंजुरीची कार्यपद्धती आणि संनियंत्रण याबाबत एकसमान मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय-

मदत व पुनर्वसन विभागाने वाचा क्र.५ येथील दि.१४ ऑक्टोबर, २०२६ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील ३०४ तालुके 'दुष्काळी तालुके' म्हणून जाहीर केले आहेत. या पार्श्वभूमीवर आगामी काळात पिण्याचे पाणी, पशुधनासाठी चारा व पाणी तसेच इतर जीवनावश्यक गरजांच्या अनुषंगाने उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्याकरिता जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत मंजूर विविध योजनांतील घटकांच्या सद्यस्थितीतील गरजा आणि टंचाई निवारणासाठीची उपयुक्तता विचारात घेऊन पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१.१ टंचाई निवारणासाठी प्राधान्याने हाती घ्यावयाची कामांचा प्राधान्यक्रम :

(१) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत उपलब्ध निधीतून संबंधित योजनांच्या निकषांनुसार पुढील कामांना प्राधान्य देण्यात यावे :

अ) उपलब्ध जलस्त्रोतांमधील पाणी टंचाईग्रस्त गावांपर्यंत पोहोचविण्यासाठी अपूर्ण जलवाहिन्या, आवश्यक पंप, विद्युत जोडण्या, साठवण टाक्या व वितरण यंत्रणा पूर्ण करणे. (केंद्र/राज्य योजनेतील असल्यास जिल्हा योजनांमधून निधी देऊ नये.)

आ) दोष दायित्व कालावधी संपलेल्या योजनांमधील नादुरुस्त घटकांची दुरुस्ती, पाणी गळती रोखणे.

इ) उपलब्ध जलस्त्रोतांना टंचाईग्रस्त कामांना जोडण्यासाठी आवश्यक कामे.

ई) अल्प निधीअभावी अपूर्ण राहिलेली व तातडीने अल्पकालावधीत पूर्ण होणारी कामे. (केंद्र/राज्य योजनेतील असल्यास जिल्हा योजनांमधून मधून निधी देऊ नये.)

उ) राज्यातील ३०४ घोषित दुष्काळी तालुक्यांमध्ये सद्य:स्थितीत जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत सुरु असलेल्या पाणी पुरवठा योजना.

ऊ) दि.३१ मार्च, २०२७ पूर्वी निश्चितपणे पूर्ण होणाऱ्या नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्रातील WTP/STP उभारणी, सांडपाण्याचा पुनर्वापर, सौर ऊर्जा प्रकल्प, जल प्रदुषणास प्रतिबंध करणाऱ्या, सार्वजनिक आरोग्य व अत्यावश्यक स्वच्छता संबंधित घनकचरा व्यवस्थापनाची कामे.

ए) वाचा क्र.७ मधील शासन निर्णयात नमूद कामे.

ऐ) पिण्याच्या पाण्याचे विद्यमान स्त्रोत बळकट करणे व जलस्त्रोतांचा सुरक्षित व कार्यक्षम वापर सुनिश्चित करणे.

ओ) जलसंधारण व सिंचनाची सुरू असलेली, टंचाई निवारणास प्रत्यक्ष मदत करणारी अनुज्ञेय कामे पूर्ण करणे.

औ) जलस्त्रोतांची साठवण क्षमता वाढविणे, जलस्त्रोतांचे बळकटीकरण, नवीन जलस्त्रोत निर्मिती, जलसंधारण आणि दीर्घकालीन जलसुरक्षेशी संबंधित कामे.

अं) पशुधनासाठी पाणी व चारा उपलब्धतेशी संबंधित अनुज्ञेय उपाययोजना.

अ:) सार्वजनिक आरोग्य व अत्यावश्यक उपजिवीकेशी संबंधित अनुज्ञेय कामे.

ब) सध्याच्या टंचाईच्या कालावधीत सुरू करून पूर्ण करता येतील व प्रत्यक्ष पाणी उपलब्ध करून देतील अशी नवीन कामे.

२ टंचाई निवारणाच्या कामे निवडीसंदर्भात विचारात घ्यावयाच्या बाबी :

२.१ टंचाई निवारणाच्या अनुषंगाने कामांची निवड करताना ती कामे सध्याच्या टंचाईच्या कालावधीत सुरू करून पूर्ण करणे, जलस्त्रोतामधील पाणी किमान कालावधीत नागरिक, पशुधनास प्रत्यक्ष उपलब्ध करण्यास सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे. टंचाई निवारणाच्या कामासाठी नियमित योजनांतर्गत तरतुद पुरेशी नसल्यास त्या कामांकरिता पुनर्विनियोजनाव्दारे निधी उपलब्ध करुन द्यावा लागेल. यास्तव जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांनी तालुकानिहाय जलस्त्रोत, पाणीसाठा, यंत्रणांची स्थिती व अडचणींचा तातडीने आढावा घ्यावा.

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांनी वरील परिच्छेद क्र.१.१ मध्ये नमूद कामांची निवड करताना उपलब्ध पाणी, अतिरिक्त पाणी, प्रत्यक्ष पाणी उपलब्ध होण्याचा कालावधी, आवश्यक निधी, लाभार्थी गावे/लोकसंख्या/पशुधन, तांत्रिक व्यवहार्यता विचारात घ्यावी.

विद्यमान योजनेत अनुज्ञेय नसलेले काम या शासन निर्णयाच्या आधारे मंजूर करू नये. जलजीवन मिशन व केंद्र पुरस्कृत योजनांतील अपूर्ण कामांसाठी केंद्र हिस्सा ऐवजी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) चा निधी वापरता येणार नाही. अशा कामांसाठी संबंधित केंद्र/राज्य योजनांकरिता मंजूर नियतव्ययातून निधी देणे आवश्यक राहील.

प्रस्तावित कामांसाठी संबंधित विभागांची परवानगी व प्रचलित नियमांचे पालन करावे. नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची आणि पशुधनाच्या वर्तमान व आगामी अत्यावश्यक गरजांची पुर्तता होईल याची दक्षता घेण्यात यावी. विद्यमान जलस्त्रोतांचा वापर करताना अनियंत्रित पाणी उपसा केला जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

३. काम पूर्णत्वाचा कालावधी :

सध्याच्या टंचाई कालावधीत पूर्ण होऊन त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळेल अशा कामांनाच प्राधान्य देण्यात यावे. सर्वसाधारणपणे चालू आर्थिक वर्षात पूर्ण न होणाऱ्या नवीन कामांना या विशेष प्राधान्यक्रमांतर्गत मंजुरी देऊ नये. अपवादात्मक परिस्थितीत पिण्याचे पाणी/पशुधनासाठी पाणी/अत्यावश्यक जलस्रोत निर्मिती संबंधित एखादे काम विशेष परिस्थितीत करणे अपरिहार्य असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेऊन व पुढील वर्षाचे दायित्व स्पष्टपणे नमूद करून निर्णय घ्यावा. अशा प्रकारच्या अतिरिक्त दायित्वाची मर्यादा जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०२६-२७ च्या मंजूर नियतव्ययाच्या १०% राहील. सदर दायित्व जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०२७-२८ च्या मंजूर नियतव्ययामधून अदा करणे आवश्यक राहील.

या शासन निर्णयाच्या अंमलबजावणीमुळे पुढील आर्थिक वर्षामध्ये अनावश्यक आर्थिक दायित्वे निर्माण होणार नाहीत, याची दक्षता घेण्यात यावी.

४. अत्यावश्यक नसलेल्या नवीन बांधकामांना तात्पुरती स्थगिती :

४.१ वाचा क्र.५ येथील शासन निर्णयान्वये घोषित केलेल्या ३०४ दुष्काळी तालुक्यातील टंचाई निवारणाच्या प्राधान्याच्या कामासाठी मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. याकरिता जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांनी ३०४ दुष्काळी तालुक्यात दुष्काळ घोषणा लागू असेपर्यंत पाण्याचा मोठ्या प्रमाणावर वापर होणारी कामे व टंचाई निवारणासाठी अत्यावश्यक नसलेल्या नवीन कामांचा आढावा घ्यावा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांनी अशा कामांना संबंधित योजनांच्या निकषाच्या अधिनतेने विहित कार्यपध्दतीचे पालन करुन तात्पुरती स्थगिती देण्याची कार्यवाही करावी.

४.२ आढाव्यात प्रामुख्याने अत्यावश्यक नसलेली नवीन उद्याने/ सुशोभीकरणाची कामे, नवीन कार्यालयीन/प्रशासकीय इमारती बांधकाम, लेखाशीर्ष ३०५४ व ५०५४ अंतर्गत ग्रामीण व इतर जिल्हा मार्गातील सर्व सिमेंट रस्ते, जन सुविधा व मोठ्या ग्रामपंचायत योजनेतील अंतर्गत सिमेंट रस्ते व गटार, नवीन नाले/गटार व पाणी जास्त लागणारी अन्य कामांचा विचार करता येईल. किरकोळ दुरुस्तीच्या नावाखाली नवीन बांधकामे करण्यात येऊ नयेत. ही उदाहरणे सर्वसमावेशक सूची म्हणून समजण्यात येऊ नयेत; प्रत्येक

कामाबाबत संबंधित योजनेचे निकष, सार्वजनिक गरज व सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने निर्णय घेण्यात यावा.

४.३ प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे तथापि प्रत्यक्ष काम सुरू झालेले नाही अशी कामे पुढे ढकलण्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने कारणांसह निर्णय घ्यावा.

४.४ सुरू असलेल्या कामांना सरसकट स्थगिती देण्यात येऊ नये. अशा कामांबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने करारातील अटी, सार्वजनिक सुरक्षितता, कामाची सद्यस्थिती, आधीच झालेला खर्च, संभाव्य नुकसानभरपाई / आर्थिक दायित्वे व पाण्याचा वापर विचारात घेऊन प्रकरणनिहाय निर्णय घ्यावा.

४.५ तात्पुरती स्थगिती दिलेल्या किंवा पुढे ढकललेल्या कामांसाठी उपलब्ध असलेल्या निधीचा आढावा घेऊन त्या कामांकरिताचा निधी पुनर्विनियोजनाद्वारे राज्यातील ३०४ दुष्काळी तालुक्यातील टंचाई निवारणाच्या प्राधान्याच्या कामासाठी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात यावी. या स्थगितीचा उद्देश उपलब्ध पाण्याचा अत्यावश्यक गरजांसाठी वापर सुनिश्चित करणे आणि जिल्हा वार्षिक योजनेतील निधीचे प्राधान्यक्रमानुसार नियोजन करणे हा आहे.

५. स्थगितीतून अपवाद :

५.१ परिच्छेद क्रमांक ४ मधील तरतुदी पुढील अत्यावश्यक कामांना लागू राहणार नाहीत :

परिच्छेद ४ मधील तात्पुरत्या स्थगितीचा विचार करताना पुढील अत्यावश्यक कामे अपवाद म्हणून विचारात घेता येतील, मात्र ती संबंधित योजनेत अनुज्ञेय व आवश्यक मंजुरीप्राप्त असणे बंधनकारक राहील :

अ) पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेशी थेट संबंधित कामे.

आ) विद्यमान जलस्रोतांचे बळकटीकरण व अत्यावश्यक नवीन जलस्रोत निर्मिती.

इ) पशुधनासाठी पाणी उपलब्ध करून देणारी कामे आणि संबंधित विभागाच्या लागू नियमांनुसार चारा उपलब्धतेची कामे.

ई) टंचाई निवारणासाठी आवश्यक जलसंधारण व लघुसिंचनाची अनुज्ञेय कामे.

उ) सार्वजनिक आरोग्य व सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यावश्यक कामे.

ऊ) आपत्कालीन परिस्थितीत तातडीने करणे आवश्यक असलेली कामे.

५.२ अपवाद म्हणून काम मंजूर करताना संबंधित कामाची अत्यावश्यकता, अपेक्षित लाभ, काम पूर्ण होण्याचा कालावधी व निधीची आवश्यकता लेखी नोंदवावी. कोणत्याही परिस्थितीत नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी राखीव असलेल्या पाण्याचा बांधकामासाठी वापर करण्यात येऊ नये. या कामांमुळे आर्थिक दायित्व निर्माण झाल्यास असे दायित्व वरील परिच्छेद क्र.३ मध्ये नमूद विहित मर्यादेत राहील याची दक्षता घ्यावी. तसेच सदर दायित्व आर्थिक वर्ष २०२७-२८ साठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) करिता मंजूर वित्तीय तरतुदीमधून अदा करणे आवश्यक राहील.

६. निधीचे नियोजन व पुनर्विनियोजन :

६.१ जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत मंजूर नियतव्ययामधून टंचाई निवारणाच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देताना वरिल परिच्छेद क्र.१.१ मध्ये नमूद केलेला प्राधान्यक्रम विचारात घेण्यात यावा. विशेषत: विद्यमान जलस्त्रोतांमधील पाणी नागरिकांपर्यत पोहोचविण्यासाठी आवश्यक असलेली अपुर्ण कामे आणि अल्प निधी अभावी अपुर्ण राहिलेली कामे पूर्ण करण्यासाठी संबंधित केंद्र/ राज्य योजनांमधून निधी उपलब्ध करुन देण्यास प्राधान्य देण्यात यावे.

६.२ संबंधित जिल्ह्यात अत्यावश्यक नसलेल्या कामांसाठी उपलब्ध असलेला व अद्याप खर्च न झालेला निधी, कामांची भौतिक व आर्थिक प्रगती, विद्यमान आर्थिक दायित्वे याचा आढावा घेण्यात यावा. संबंधित योजनांमधील निधी वापराच्या अटी विचारात घेण्यात याव्यात. नियोजन विभागाच्या वाचा क्र.२ व ७ येथील शासन निर्णयातील पुनर्विनियोजनासंदर्भातील तरतुदीच्या अनुषंगाने सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजूरीने अत्यावश्यक नसलेल्या कामांसाठी अनुज्ञेय असलेल्या निधीचे पुनर्विनियोजन दि.३१ डिसेंबर, २०२६ अखेरपर्यंत करण्यात यावे. अशा प्रकारे पुनर्विनियोजनाव्दारे उपलब्ध होणारा निधी राज्यातील ३०४ दुष्काळी तालुक्यातील टंचाई निवारणाच्या कामांकरिता वापरण्यात यावा.

६.३ टंचाई निवारणासाठी प्रस्तावित कामांकरिता संबंधित प्रशासकीय विभागांच्या नियमित राज्य योजना, केंद्र पुरस्कृत योजना किंवा इतर उपलब्ध निधी स्त्रोतांचा प्रथम आढावा घ्यावा. संबंधित योजनांच्या अटींच्या अधीन राहून निधीचा समन्वय साधावा. एकाच कामासाठी किंवा खर्चाच्या एकाच घटकासाठी दुबार निधी उपलब्ध होणार नाही याची दक्षता घ्यावी.

६.४ या शासन निर्णयाच्या आधारे जिल्हाधिकारी, जिल्हा नियोजन समिती किंवा अन्य कोणत्याही प्राधिकाऱ्यांस विद्यमान शासन निर्णय / नियमांपेक्षा अधिकचे आर्थिक किंवा प्रशासकीय अधिकार प्राप्त होणार नाहीत. निधीचे पुनर्विनियोजन व वितरण, विद्यमान अधिकारातच करण्यात यावे.

७. टंचाई निवारणासाठी जिल्हास्तरीय कृती आराखडा :

७.१ जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांनी हा शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत संबंधित विभागांच्या जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करावी.

७.२ सदर बैठकीत तालुकानिहाय उपलब्ध जलस्त्रोत, प्रत्यक्ष पाणीसाठा, पिण्याच्या पाण्याची सद्यस्थिती, अपूर्ण पाणीपुरवठा योजना, सुरू असलेली कामे, आवश्यक अतिरिक्त निधी आणि चालू टंचाईच्या कालावधीत पूर्ण होऊ शकणारी नवीन कामे यांचा आढावा घ्यावा.

७.३ मदत व पुनर्वसन विभाग आणि पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्यास्तरावर जिल्हाधिकारी टंचाई कृती आराखडा तयार करतात. त्यामुळे जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांनी संबंधित विभागांकडून माहिती प्राप्त करुन पंधरा दिवसांच्या आत तालुकानिहाय व कामनिहाय जिल्हास्तरीय कृती आराखडा, टंचाई कृती आराखडयांशी एकात्मिक करावा. त्यामध्ये या शासन निर्णयासोबतच्या "प्रपत्र -अ" प्रमाणे माहिती असावी.

७.४ वारंवार टंचाई निर्माण होणाऱ्या गावांसाठी तातडीच्या उपाययोजनांबरोबरच कायमस्वरूपी जलस्त्रोत बळकटीकरण / निर्मितीच्या उपाययोजनांचाही विचार करावा. तथापि, त्यामुळे चालू टंचाईच्या कालावधीत प्रत्यक्ष पाणी उपलब्ध करून देणाऱ्या कामांच्या प्राधान्यक्रमावर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घ्यावी.

७.५ मदत व पुनर्वसन विभाग आणि पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या स्तरावर जिल्हाधिकारी यांच्याकडून तयार करण्यात येणाऱ्या टंचाई कृती आराखडयातील ज्या कामांसाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून निधी उपलब्ध झाला असेल अशा कामांसाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) मधून निधीची तरतूद करण्यात येऊ नये.

८. टंचाई निवारणाच्या तातडीच्या उपाययोजनांसाठी विशेष मान्यता :

परिच्छेद क्रमांक ७ नुसार तयार केलेल्या जिल्हास्तरीय कृती आराखड्यातील कामांना तातडीने मान्यता देणे आणि निधी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यकतेनुसार पुढील कार्यपद्धती अवलंबण्यात यावी :

<u>अत्यावश्यक उपाययोजनांची मंजुरी</u>

अ) दुष्काळ अथवा टंचाईच्या उपाययोजनांतील कामांना विहित कार्यपध्दतीने जिल्हा नियोजन समितीची मान्यता घेण्यात यावी.

आ) एखाद्या अत्यावश्यक व तातडीच्या उपाययोजनेच्या बाबतीत जिल्हा नियोजन समितीची बैठक आयोजित करुन निर्णय घेण्यास विलंब होणार असेल व त्यामुळे टंचाई निवारणाच्या उपाययोजनांची अंमलबजावणी बाधित होत असेल तर अशा प्रकरणी जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांनी संबंधित उपाययोजनेची तातडी, कामाचे स्वरुप, अपेक्षित लाभ, आवश्यक निधी व विलंबाची कारणे नमूद करुन पालकमंत्री तथा अध्यक्ष, जिल्हा नियोजन समिती यांच्याकडे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावा. पालकमंत्री तथा अध्यक्ष, जिल्हा नियोजन समिती यांची मान्यता प्राप्त झाल्यास, सदर मान्यतेस जिल्हा नियोजन समितीच्या पुढील बैठकीत मंजूरी प्राप्त करुन घेण्याच्या अधिन राहून, निधी उपलब्ध करून देण्यात यावा.

इ) अशा प्रकारे मान्यता प्राप्त सर्व उपाययोजना, त्यासाठीचा मंजूर निधी, प्रत्यक्ष खर्च आणि तातडीच्या निर्णयाची कारणे यांचा तपशील जिल्हा नियोजन समितीच्या लगतच्या बैठकीत मंजुरीसाठी सादर करणे जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव यांना बंधनकारक राहील.

ई) या विशेष कार्यपद्धतीचा अवलंब केवळ अत्यावश्यक व तातडीच्या टंचाई निवारण उपाययोजनांसाठी करावा. या कार्यपध्दतीनुसार मान्यता देताना संबंधित योजनांचे निकष, निधीच्या विहित मर्यादा, प्रशासकीय व तांत्रिक मान्यता आणि प्रचलित वित्तीय नियमांचे पालन करणे आवश्यक राहील.

९. जिल्हा वार्षिक योजनेतील अनुज्ञेय योजनांची माहिती :

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत विविध प्रशासकीय विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांपैकी टंचाई निवारणासाठी उपयुक्त योजनांसंदर्भात खालील मुद्यांची प्रमाणित माहिती संबंधित प्रशासकीय विभागांनी नियोजन विभागास १५ दिवसांच्या आत उपलब्ध करून द्यावी.

अ) योजनेचे नाव.

आ) संबंधित शासन निर्णय.

इ) टंचाई निवारणासाठी अनुज्ञेय घटक.

ई) निधी वापराच्या अटी व मर्यादा.

उ) अंमलबजावणी करणारी यंत्रणा.

ऊ) आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेचे अधिकार.

जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाकरिता संबंधित विभागांकडून प्राप्त माहितीच्या आधारे नियोजन विभाग टंचाई निवारणासाठी उपयुक्त योजनांची एकत्रित संदर्भ यादी प्रसिद्ध करेल. मात्र, सदर यादीत समावेश झाल्याने त्या योजनेचे विद्यमान निकष, अटी किंवा निधी वापराच्या मर्यादा शिथिल झाल्याचे समजण्यात येऊ नये.

१०. संनियंत्रण, लेखा व अहवाल :

जिल्हाधिकाऱ्यांनी टंचाई निवारणासाठी मंजूर कामांचा दरमहा आढावा घ्यावा. या शासन निर्णयांतर्गत प्रत्येक कामासाठी प्रपत्र ब मध्ये नमूद बाबींची काम निहाय स्वतंत्र नोंद ठेवण्यात यावी.

जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांनी संबंधित विभागांच्या समन्वयाने कामाची प्रगती व निधी वापर याची अद्ययावत माहिती संकलित करावी. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांनी प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत नियोजन विभाग व वित्त विभागास 'प्रपत्र -क' नुसार माहिती सादर करावी.

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांनी मंजूर कामांची यादी, मंजूर निधी, प्रत्यक्ष खर्च आणि कामांची प्रगती याबाबतची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर अथवा उपलब्ध शासकीय संगणकीय प्रणालीवर प्रसिद्ध करावी.

११. आर्थिक शिस्त व जबाबदारी :

११.१ या शासन निर्णयांतर्गत निधी उपलब्ध करून देताना संबंधित योजनेचे निकष, मंजूर अर्थसंकल्पीय तरतूद, निधी वितरणाची कार्यपद्धती व लागू वित्तीय नियमांचे पालन करण्यात यावे.

११.२ प्रत्येक कामास प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता व वाचा येथील शासन निर्णय क्र.४ नुसार युनिक आयडी प्राप्त करुन घेतल्यानंतरच सुरू करावे. काम सुरु करण्यापुर्वीची स्थिती व काम पुर्ण झाल्यानंतरची स्थितीची छायाचित्रे जीआयएस टॅगिंगसह सादर करणे आवश्यक राहिल. प्रशासकीय व तांत्रिक मान्यता असलेल्या कामांनाच निधी उपलब्ध करुन द्यावा. चालु आर्थिक वर्षातील निधीची उपलब्धता विचारात घेऊनच कामांना मंजूरी द्यावी. निधी उपलब्धतेची खात्री न करता किंवा सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता नसताना दायित्व निर्माण करू नये. पुढील आर्थिक वर्षात अनावश्यक आर्थिक दायित्वे निर्माण होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

११.३ संबंधित योजनेच्या उद्देशाव्यतिरिक्त निधीचा वापर करू नये. दुबार निधी, निधीचा गैरवापर, नियमबाह्य पुनर्विनियोजन किंवा अनियमित खर्च आढळल्यास संबंधित अधिकारी / अंमलबजावणी यंत्रणेची जबाबदारी प्रचलित नियमांनुसार निश्चित करण्यात येईल. या शासन निर्णयातील योजना / कामे यांची अंमलबजावणी, संनियत्रण, लेखा परिक्षण, विधीमंडळ कामकाज इ.ची जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणा आणि संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाची राहील.

११.४ या शासन निर्णयामुळे निविदा, खरेदी, करार, पर्यावरणीय / जलसंपत्तीविषयक परवानग्या किंवा इतर वैधानिक मंजुरींच्या अटींना सूट मिळणार नाही.

१२. शासन निर्णयाची व्याप्ती :

मदत व पुनर्वसन विभागाने घोषित केलेल्या ३०४ दुष्काळी तालुक्यांमध्ये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत उपलब्ध निधीच्या नियोजनासाठी या शासन निर्णयातील तरतुदी लागू राहतील. हा शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर मदत व पुनर्वसन विभागाकडून नव्याने दुष्काळग्रस्त अथवा टंचाई परिस्थिती घोषित करण्यात येणाऱ्या तालुक्यांनाही या तरतुदी लागू राहतील.

संबंधित तालुक्यात दुष्काळ अथवा टंचाईसदृश परिस्थितीची घोषणा लागू राहणार नसल्यास परिच्छेद क्रमांक ४ मधील तात्पुरत्या स्थगितीबाबत पुनर्विचार करण्यात यावा. स्थगित कामे पुन्हा सुरू करताना निधीची उपलब्धता, कामाची आवश्यकता, करारातील अटी आणि सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता विचारात घ्यावी.

या शासन निर्णयातील तरतुदी संबंधित दुष्काळ अथवा टंचाईसदृश परिस्थितीची घोषणा लागू असेपर्यंत आणि त्या घोषणेतील अटी व मर्यादांच्या अधीन राहून लागू राहतील. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत संबंधित प्रशासकीय विभागांच्या मंजूर योजनांमधील अनुज्ञेय घटकांसाठीच या शासन निर्णयानुसार निधी उपलब्ध करून देता येईल. या शासन निर्णयामुळे कोणतीही नवीन योजना किंवा विद्यमान योजनेतील नवीन खर्चाचा घटक आपोआप मंजूर झाल्याचे समजण्यात येऊ नये. मदत व पुनर्वसन विभागाने दुष्काळ अथवा टंचाईसदृश परिस्थितीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय आणि जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत विविध योजनांबाबत संबंधित प्रशासकीय विभागांनी निर्गमित केलेले शासन निर्णय व मार्गदर्शक सूचना यांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.

या शासन निर्णयातील तरतुदी सन २०२६-२७ करिता लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत असून त्याचा संकेतांक २०२६१११९१५०३५९००१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NITIN BHANUDAS KHEDKAR

Digitally signed by NITIN BHANUDAS KHEDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT, 2.5.4.20=99977b58556463dbb2db463cec9482d13f7661ed3b2a95e83e38685fff4c21e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=CFCA827F49093860DB8AA4627DA10E31F82BD40A9631D2E01EC212A473A6BCA2, cn=NITIN BHANUDAS KHEDKAR
Date: 2026.11.19 15:06:49 +05'30'

(नि. भा. खेडकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति

१. मा. राज्यपालांचे सचिव, लोकभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व मा.मंत्री /मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. कार्याध्यक्ष, राज्य नियोजन मंडळ, मुंबई.
८. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. सर्व विभागीय आयुक्त.
११. सर्व जिल्हाधिकारी.
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१३. आयुक्त, अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४. सर्व सह सचिव / उप सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. निवड नस्ती, जिनिस-१, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

“प्रपत्र -अ”

शासन निर्णय क्रमांक : डीएपी-२०२६/ प्र.क्र.२८८(ई- १८९८८९२)/ जिनिस-१, दि. १९ नोव्हेंबर, २०२६.

१) दुष्काळ/टंचाईसदृश परिस्थिती घोषित तालुके व बाधित गावे/वस्त्या.

२) संबंधित तालुक्यातील गावनिहाय व वस्तीनिहाय पिण्याच्या पाण्याची सद्यस्थिती, उपलब्ध जलस्रोत व त्यामधील प्रत्यक्ष पाणीसाठा.

३) पाण्याची विद्यमान व अपेक्षित मागणी.

४) पशुधनाची संख्या व त्यासाठी आवश्यक पाणी.

५) संभाव्य टंचाईचा कालावधी.

६) अपूर्ण पाणीपुरवठा योजना, आवश्यक दुरुस्तीची कामे.

७) सुरु असलेल्या कामांची भौतिक व आर्थिक प्रगती.

८) अपूर्ण काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक अतिरिक्त निधी.

९) सध्याच्या टंचाईच्या कालावधीत पूर्ण होऊ शकणारी नवीन कामे.

१०) प्रत्येक काम पूर्ण होण्याचा अपेक्षित कालावधी.

११) प्रत्यक्ष पाणी उपलब्ध होण्याचा अपेक्षित दिनांक.

१२) प्रस्तावित कामामुळे उपलब्ध होणाऱ्या अतिरिक्त पाण्याचे अंदाजित प्रमाण व लाभार्थी गावे, लोकसंख्या आणि पशुधन.

१३) स्थगित/पुढे ढकलण्याचा प्रस्ताव असलेली कामे व त्यातून पुनर्विनियोजनासाठी संभाव्यतः उपलब्ध होणारा निधी.

१४) प्रस्तावित निधीचे पुनर्विनियोजन, निधीचा स्रोत आणि पुढील आर्थिक वर्षामध्ये निर्माण होणारी संभाव्य आर्थिक दायित्वे.

****

"प्रपत्र -ब"

शासन निर्णय क्रमांक : डीएपी-२०२६/ प्र.क्र.२८८(ई- १८९८८९२)/ जिनिस-१, दि. १९ नोव्हेंबर, २०२६.

i. प्रशासकीय मान्यता.
ii. तांत्रिक मान्यता.
iii. मंजूर निधी.
iv. वितरित निधी.
v. प्रत्यक्ष खर्च.
vi. कामाची भौतिक प्रगती.
vii. काम पूर्ण झाल्याचा दिनांक.
viii. प्रत्यक्ष उपलब्ध झालेले अतिरिक्त पाणी.
ix. लाभार्थी गावे, लोकसंख्या व पशुधन.

“प्रपत्र- क”

शासन निर्णय क्रमांक : डीएपी-२०२६/ प्र.क्र.२८८(ई- १८९८८९२)/ जिनिस-१, दि. १९ नोव्हेंबर, २०२६.

अ) उपलब्ध जलस्रोतांमधील पाणी वापरण्यासाठी उपलब्ध करून दिलेला निधी.

आ) जलस्रोत बळकटीकरण किंवा निर्मितीसाठी उपलब्ध करून दिलेला निधी.

इ) पूर्ण झालेली कामे.

ई) प्रत्यक्ष उपलब्ध झालेले अतिरिक्त पाणी.

उ) नागरिकांना पाणी उपलब्ध होण्याचा कालावधी.

ऊ) स्थगित अथवा पुढे ढकलण्यात आलेली कामे.

ए) निधीचे पुनर्विनियोजन.

ऐ) निर्माण झालेली किंवा संभाव्य आर्थिक दायित्वे.